निरीक्षक, वैधमापन शास्त्र या संवर्गातील पदांना राजपत्रित गट “ब” हा दर्जा देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१३/९४०/प्र. क्र. ३०६/ ग्रा.सं.-३
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०९.०५.२०१७

शासन निर्णय :-

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिपत्याखालील वैधमापन शास्त्र यंत्रणेतील निरीक्षक (कनिष्ठ श्रेणी) व निरीक्षक (निवडश्रेणी) संवर्गातील पदांना अराजपत्रित गट “क” हा दर्जा असून या पदांची ५ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी अनुक्रमे रु.५०००-८००० व रु.५५००-९००० अशी आहे. वैधमापन शास्त्र विभागातील निरीक्षक वैधमापनशास्त्र हे पद तालुकास्तरावरील कार्यालय प्रमुखाचे पद आहे. निरीक्षक, वैधमापन शास्त्र या पदाचे केंद्र शासनाने पारित केलेल्या वैधमापन शास्त्र अधिनियम २००९ नुसार वैधमापन शास्त्र अधिकारी असे नामकरण केले आहे. निरीक्षक, वैधमापन शास्त्र या पदाच्या समकक्ष असलेल्या व समान शैक्षणिक अर्हता आवश्यक असणाऱ्या अन्य विभागातील पदांना श्रेणीवाढ देऊन राजपत्रित दर्जा देण्यात आलेला आहे. निरीक्षक हे अंमलबजावणीस प्रत्यक्ष जबाबदार अधिकारी आहेत.याचा एक भाग म्हणून उल्लंघनाशी संबंधित असलेले वजन वा माप किंवा आवेष्टीत वस्तू, अन्य कागदपत्रे जप्त करणे आवश्यक असते. ही जप्तीची कारवाई भारतीय दंड प्रक्रीया संहिता, १९७९ मधील तरतुदीनुसार होणे आवश्यक आहे. निरीक्षक हा गट-क मधील कर्मचारी असल्याने न्यायालयामध्ये या प्रकरणामध्ये सहायक शासकीय अभियोक्ता म्हणून जबाबदारी पार पाडण्यास मर्यादा येतात. या सर्व बाबींचा विचार करता निरीक्षक, वैधमापनशास्त्र गट-क (अराजपत्रित) या पदास **राजपत्रित गट “ब”** दर्जा दिल्यास त्यांना त्यांची कामे अधिक परिणामकारकपणे पार पाडणे शक्य होईल. निरीक्षक, वैधमापन शास्त्र संवर्गातील अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या लक्षात घेता त्यांना राजपत्रित अधिकारी गट “गट-ब” हा दर्जा देण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने आता निरीक्षक, वैधमापन शास्त्र या संवर्गातील पदांना **राजपत्रित गट “ब”** हा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. तथापि निरीक्षक, वैधमापन शास्त्र संवर्गातील पदांना राजपत्रित गट “ब” हा दर्जा देण्यात येत असला तरी त्यांच्या विद्यमान वेतनश्रेणीमध्ये कोणताही बदल होणार नाही.

३. हा निर्णय दि. ०९ /०५/२०१७ पासून अंमलात येईल.

४. निरीक्षक (राजपत्रित) गट-ब, वैधमापन शास्त्र, या संवर्गासाठीचे सेवाप्रवेश नियम स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येतील.

५. सदरचा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाने विहित अटींच्या अधिन राहून दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१७१११३०१५५२४५५७०६ असा आहे.हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shubhangi Ashay Pote

Digitally signed by Shubhangi Ashay Pote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food, Civil Supplies, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f67e195634f0df9371bbf2f3aca86f9d3e8da3b165ed00c4c12c06e309cd2784, serialNumber=1a3686057ba04185addb654edec4de91e5e9aa1e243bae1702175810f69a3e15, cn=Shubhangi Ashay Pote
Date: 2017.12.29 17:10:46 +05'30'

(शुभांगी पोटे)
कार्यासन अधिकारी
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रति,

१) महालेखापाल-१,(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
२) महालेखापाल-१, (लेखा व परीक्षा), मुंबई.
३) नियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई.
४) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
५) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
६) अवर सचिव /१२, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवडनस्ती, (ग्रा.सं.-३).